IMPACT FACTOR:4.197(IIJIF) ISSN: 2454-5503

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 6 SPECIAL ISSUE 1 JUNE 2020

A Bimonthly Peer Reviewed International Journal

Special Issue On

# Life, Culture and Education Today

(Book 1)

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**

*Guest Editors*
**Prin. Dr V.D. Satpute**
**Prin. Dr V.S.Anigunte**
**Prin. Dr H.P.Kadam**

*Mahatma Gandhi Education and Welfare Society's*
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES, KALYAN (W)**
*www.mgsociety.in +91 8329000732 Email: chcskalyan@gmail.com*

Special Issue on the Occasion of Two Day International Interdisciplinary International Virtual Conference on *Life, Culture and Education Today*, on 5-6 June 2020, jointly organised by Mahatma Gandhi Education & Welfare Society, Parbhani (M.S.),Late Ramesh Warpudkar ACS College, Sonpeth Dist. Parbhani (M.S.), Shri Panditguru Pardikar College, Sirsala, Dist. Beed (M.S.) and Kala Mahavidyalaya, Nandurghat, Dist. Beed (M.S.)

---

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal**
**Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS). Email: chcskalyan@gmail.com

*Guest Editors* Dr. V.D.Satpute, Dr. V.S.Anigunte and Dr. H.P.Kadam

*Chief Editor :*
**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,**Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Dr Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Dr Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr Dashrath Kamble**, Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

Aju Mukhopadhyay,
Dr R.T. Bedre,
Dr (Mrs.) Smita R. Nagori,
Dr Arvind Nawale
Dr Rajiv Kumar,
Dr Kailash Nimbalkar,
Tsai-ching Yeh
Dr B. N. Gaikwad,
Dr Simon Philip,
Dr Binu Anitha Josheph
Dr Ramkishan Bhise

**Subscription Rates**

| | |
|---|---|
| Annual Membership (Individual) | ₹ 1,800 |
| Bi-annual Membership | ₹ 3,500 |
| Institutional Annual Membership | ₹ 2,200 |
| Institutional Bi-annual Membership | ₹ 4,200 |
| Annual Membership for Foreigners) | $150 |

*Printed by* Seema Gangarde, New Man Publication, Parbhani
Email: chcskalyan@gmail.com Mob. + 91 9730721393

---

**DISCLAIMER**: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

# अनुक्रमणिका


१. उच्च शिक्षण : व्यक्तिमत्व विकास आणि मानवीय मूल्य
**डॉ. एस.एन. आकुलवार** | ०६

२. कोरोना व्हायरस : भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम
**अतुल दत्तु जगताप** | १०

३. कोरोना १९ चा भारतातील लघु आणि मध्यम उदयोगावरील परिणाम **डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे** | १४

४. आदिवासी समाजातील विधवा स्त्रीयांचा दर्जा : एक समाजशास्त्रीय अध्ययन (संदर्भ बिलोली तालूका)
**डॉ.सुरेश वि.धनवडे** | २२

५. कोव्हिड-19 साथी दरम्यान प्रतिकारक्षमते चे महत्व व भूमिका
**प्रा. वाकणकर गोविंद बन्सीधरराव** | ३०

६. आंबेडकर विचार: शोधमीमांसा आणि भाष्य
**डॉ.बी.एम.काळे** | ३४

७. मध्ययुगीन संतकवयित्रीच्या कवितेतील जातलिंगभाव
**डॉ. कीर्तीकुमार मोरे** | ४१

८. महात्मा गांधीजीचे आदर्श गाव : एक अभ्यास
**डॉ. मुरुडकर एम.एस.** | ५१

९. कोव्हिड-19 चे रोजगार व बँकिंग क्षेत्रावरील परिणाम: एक चिकित्सक अभ्यास
**डॉ. बी. एच. दामजी / श्री निखील महादेव तळेकर** | ५३

१०. कोविड -१९ चा भारतावरील आर्थिक व सामाजिक परिणाम
**डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई** | ५९

११. भारतातील रोजगार,आर्थिक व सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रावरिल कोविड – १९ चा परिणाम
**डॉ.संजय गव्हाणे** | ६५

१२. भिल्लांचा लोकनाट्यप्रकार : सोंगाड्या
**डॉ. मोनिका शांतीलाल ठक्कर** | ७१

१३. आदिवाशींच्या शिक्षणाचे शवविच्छेदन करणारी कादंबरी : माझी काटेमुंढरीची शाळा
**संतोष मारुती लोंढे** | ७७

१४. उच्च शिक्षण: आव्हाने आणि उपाय
**डॉ. शैलजा भारतराव बरुरे** | ८१

१५. उच्चशिक्षणातील आव्हाने व उपाययोजना
**डॉ. शीला संजय खेडीकर** | ८६

१६. कोरोना महामारीमुळे संकटात सापडलेल्या अर्थव्यवस्थांवर अनेक देशांनी केलेल्या उपाययोजना व जाहीर केलेली आर्थिक पॅकेजयांचा आढावा
**सौरभ संजय पाटील** | ९३

१७. कोरोनानंतरचे उच्च शिक्षण : नवी आव्हाने
**डॉ. यादव सूर्यवंशी** | ९८

१८. गावविकासात आमूलाग्र बदल करणारी रचनाः कुळवाडी अभंग
**प्रा. डॉ. गोपनर के.एस.** | १०४

१९. कोकणातील दलितांचे लोकगीते
**डॉ. गायत्री सोपान गाडेकर** | १०९

२०. भारतातील रोजगार, अर्थव्यवस्था व कोवीड १९
**डॉ. चंदु रामभाऊ पाटील** | १२२

७

# मध्ययुगीन संतकवयित्रीच्या कवितेतील जातलिंगभाव

**डॉ. कीर्तीकुमार मोरे,**
मराठी विभाग प्रमुख,
संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे असे म्हटले जाते. तेरावे शतक हे वारकरी संप्रदायाच्या उदयाचे शतक तद्वतच अनेक संप्रदायाच्या उदयाचे शतक आहे. महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, नाथ, सुफी, दत्त आदी संप्रदाय याच शतकाच्या आगे मागे निर्माण झाले. भाषा बंदिस्त आणि ब्राह्मणकेंद्री वैदिक धर्मबंधनातून विलग होऊन या संप्रदायांनी आपापल्या विदग्ध धर्मभावनांना नवी वाट प्रदान केली. वारकरी संप्रदाय अशा असंतोषातूनच निर्माण झालेली वेगळी वाट होती. संस्कृत ऐवजी मराठी प्राकृताचा म्हणजेच लोकभाषेचा स्वीकार, आध्यात्मिक समता, जातवर्णलिंग भेदांना भक्तीसागरात थारा नसणे, सर्वांना आपलेसे वाटणारा, सर्वांच्या मदतीला धावणारे, मिथ्या बडेजाव नसणारे असे ईश्वररुप इत्यादी या संप्रदायाच्या जमेच्या बाजू होत्या. त्यामुळे अठरा पगड जातीची मंडळी मुक्तपणाने व्यक्त होऊ शकली. "इतर क्षेत्रात बांधले व्यक्तीचे जीवन धर्म व्यवहारातच मोकळे होऊ शकत होते. कलावंतांच्या निर्मितीशीलतेला स्वातंत्र्याचे वातावरण हवे असते. त्यामुळे मराठी साहित्यिकांच्या निर्मितीला फुलोरा आला तो धर्मसंबद्ध जाणिवांचा." (धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी साहित्य - र. बा. मंचरकर, पृष्ठ-१५) धर्म व्यवहारातील स्वातंत्र्यामुळे स्त्रीयांनाही मुक्तकंठाने आपल्या धर्मभावना व्यक्त करणे शक्य झाले. संत जनाबाई, मुक्ताबाई, सोयरा, कान्होपात्रा, निर्मळा, बहिणाबाई इत्यादी अनेक कवयित्रींनी त्यामुळेच अभंगरचना केली. स्त्रीजीवनाचे अलक्षित उपेक्षित पदर, वेदना आणि प्रसंगी विद्रोह त्यांनी मांडला. "या काळातील अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही काही मोजक्या स्त्रीयांनी आपले स्वतंत्र स्था निर्माण करण्याचा निकराचा प्रयत्न केला आहे. माणूस म्हणून जगायची आस त्यांनी आपल्या अंभगातून मांडलेली दिसते. जनाबाई, कान्होपात्रा आणि सोयराबाई यांच्या अभंगातून मांडलेली दिसते. जनाबाई, कान्होपात्रा आणि सोयराबाई यांच्या अभंगातून याचा प्रत्यय येतो. समाजाने दिलेले दुःख, उपेक्षितपणाचे दुःख आणि जातीय दुःखाची मांडणी या कवयित्रींनी आपल्या अभंगातून केलेली दिसते." (जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य- संपा. प्रा.नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, पृ. ३६४) संत कवयित्रींनी धर्मभावना व्यक्त करतानाचा आत्मपर, चरित्रपर रचनाही केली. त्यात त्यांच्या जगण्याचे, जीवनाचे विविध प्रस्तर व्यक्त झाले. जातजाणीव आणि स्त्रीजाणिवाही

व्यक्त झाल्या. त्या व्यक्त करताना अर्थातच माणूसपण नाकारले गेल्याची भावनाही तीव्रतेने व्यक्त झाली. प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीयांनी व्यक्त केलेल्या भावना किती महत्त्वाच्या होत्या हे पाहणे हाच प्रस्तुत लेखन प्रपंचामागील हेतू आहे.

महाराष्ट्रातील समाजजीवन जातवर्णलिंगभेदांच्या जोखडांनी बद्ध होते. यज्ञयाग कर्मकांडाचे प्राबल्य वाढलेले होते. 'चतुर्वर्गचिंतामणी'सारख्या ग्रंथांतून बहुजनांवर अन्याय, अत्याचाराचे सत्र उघडले होते. विषमताग्रस्त समाजव्यवस्थेविरुद्ध ब्र काढण्याची मुभा नव्हती. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' आदी धारणांमुळे सामाजिक बदलाची शक्यता मावळली होती. या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदायाने अध्यात्मिक क्षेत्रात वावरण्याचे दिलेले स्वातंत्र्य विठ्ठल भक्तांसाठी पर्वणी ठरले. चोखा, कर्ममेळा, बंका यांच्यासारखे अस्पृश्य, जनाबाई, सोयरा, निर्मळा इत्यादींसारख्या हिन अस्पृश्य स्त्रीयां, कान्होपात्रेसारखी वेश्या स्त्री या प्रवाहात दाखल झाली. नामदेव, सावता, नरहरी, गोरोबांसारख्या बहुजनांना स्वतःचा अध्यात्मिक अधिकार सिद्ध करण्याची संधी प्राप्त झाली. धर्माच्या आधाराने जीवनाचे बांध मोकळे करणा-या या संधीचा फायदा संत मंडळीने घेतला.

'शिंपियाचे कुळी जन्म माझा झाला, परि हेतू गुंतला सदाशिवी', 'आमुची माळीयाची जात, शेत करु बागायत', 'आम्ही वारीक वारीक करु हजामत बारीक', 'त्रिगुणांची करुनी मुस, आत ओतीला ब्रह्मरस', 'माझा लागताची कर, शिंतोडा घेताती करार', 'बरा झालो कुणबी केलो, नसता दंभेची असतो मेलो', अशा जातजाणिवा अनुक्रमे संत नामदेव, संत सावता, संतसेना, संत नरहरी, संत चोखा, संत तुकारामादी पुरुष संतांनी व्यक्त केलेल्या दिसतात. 'जाती न पुछो साधु की' असे संत कबीराने कितीही म्हटले तरी संताच्या नावापुढे येणारी जात आम्हाला काढून टाकता येत नाही हे इथले भयाण जात वास्तव आहे. त्यामुळे सकल संतांच्या साहित्यातून जातजाणिवा व्यक्त होताना दिसतात. दुसरे असे की एकतर ही संतमंडळी आपल्या जातीत राहून धर्म स्वातंत्र्याचा उपभोग घेते. संत चोखोबा यांनी हीन यातीत जन्मा येण्याचे कारण 'पूर्वजन्मीचे पाप' गृहित धरले आहे तर जनाबाईंनीही आपल्या दास्यत्वाचे कारण 'पूर्वजन्मात' असल्याचे मान्य केले आहे. संतांनी मान्य केलेले 'कर्मसिद्धांताचे' वर्चस्व नकळत प्रतिबिंबित होते हेच खरे. याच कारणास्तव संतांच्या विद्रोहाचा स्वर तीव्र होत नाही. आणि देवही जातव्यवस्थेचे चक्र भेदण्यात असफल होतो. किंवा भक्ताच्या हाकेला धावणारा विठ्ठल जातिक अन्यायाविरुद्ध भक्तांची बाजू घेताना दिसत नाही.

संत कवयित्री जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील सख्य सर्वविदित आहे. 'माझ्या वडिलांचे दैवत, तो हा पंढरीनाथ। तेणे माझा आर्त पुरविला।' असे स्वतः

जनाबाई सांगते. नामदेवाच्या कुटुंबात दळणकांडण, सडासारवण, शेणी वेचणे, थापणे इत्यादी कामे करत 'नामयाचि दासी' होऊन राहिली. नामदेवांपेक्षा वयाने पाच-सात वर्षांनी थोरली तरी त्याचे गृहत्व पत्करुन तिने अभंगरचना केली. 'नामयाचे ठेवणे जनीस लाधले, धन सापडले विटेवरी' अशा शब्दांत नामदेवाची आणि विठ्ठलाची थोरवी व्यक्त केली. नामयाचि दासी होऊन आयुष्य रेटणा-या जनाबाईंच्या मानससृष्टीत सामावलेला विठ्ठल तिचे सर्वस्व होतो. 'माझा शिणभाग गेला तुज पाहता विठ्ठला' ही अनुभूती त्यातलीच. विठ्ठलावर ती सर्वस्वी विसंबते. 'माय मेली बाप मेला आता सांभाळी विठ्ठला' असा धावा करणा-या जनीचा तो लाखमोलाचा आधार होय. आई-वडिलांविना पोरक्या जनीला नामदेव आणि विठ्ठल हे दोन भक्कम आधार. तिची आर्त हाक ऐकून विठ्ठल तिच्या मदतीला येतो. झाडलोट करताना, दळणकांडण करताना तिला मदत करतो. तिची वेणी फणी करतो, उवा काढतो, आंघोळीला बसलेल्या जनीस विसाणाला थंड पाणी देतो. न्हाणं झाल्यानंतर जनीच्या डोईस तेल लावतो. साळी कांडताना तिचे उखळ झाडून देतो. हे सारे शिण येइतो करतो, घाम गाळतो. पितांबर भिजल्याचे भानही त्याला राहात नाही. असा हा विठ्ठल जनीवर चोरीचा आळ येतो तेव्हा मात्र तिच्या मदतीला येत नाही.

जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील सख्यभाव हाच तिच्या वेदनेला कारण होतो. एके दिवशी विठ्ठल जनी घरी येतो ती त्याची मदत घेते. त्याला जेऊ-खाऊ घालते. डोळा लागतो म्हणून विठ्ठल तेथेच झोपतो. पहाटे जाग येताच घाईघाईने देवळात जातो. त्याच्या गळयातील पदक जनीघरीच राहते. आधीच जनाबाई आणि विठ्ठल यांच्यातील सख्यसंबंध मान्य नसलेल्या अनेकांना आयते कोलीत मिळते. जनाबाईवर पदक चोरीचा आळ येतो. पदक जनीघरी अंथरुणात सापडते. आरोप सिद्ध होतो. पुढे घडलेली करुण कहाणी जनाबाई एका अभंगातून मांडते.

पदक विठ्ठलाचे गेले। ब्राह्मण म्हणती जनीने नेले
अगे शिंपियाचे जनी। नेले पदक दे आणुनी
देवासमोर तुझे घर। तुझे येणे निरंतर
वाकळ झाडुनी पाहती। पडले पदक घेऊन जाती
जनीवरी आली चोरी। ब्राह्मण करती मारामारी

या गुन्ह्याची शिक्षा म्हणून तिला सुळावर देण्याचा निर्णय होतो. तिचा सखा विठ्ठल या कठीण प्रसंगात स्वतःला लोकक्षोभापासून लपवतो. जनाबाई आणि विठ्ठल यांच्यात भक्त आणि देव नात्यापलीकडे काहीतरी आहे असा जनप्रवाद होता. जनीच्या बाजूने उभे राहिल्यास देवाच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उभे राहील ही भीती तर त्याला असावी किंवा निम्नजातीक स्त्रीची बाजू घेतल्याने

ब्राह्मणरोषाचा तो बळी ठरेल याचे तरी भय वाटले असावे. याचा अर्थ जातीक प्रश्नांचा छडा लावण्यासाठी देव दुबळा ठरला असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

जनीला संपविण्याची तयारी होते. चंद्रभागे तटी सूळ रोवून तिला सुळावर देण्यासाठी आणले जाते. चिडलेली, संतापलेली, हतबल जनी विठ्ठलाच्या नावाने येळकोट करते. 'ऐसा येळकोट केला, जनी म्हणे विठो मेला' अशा संतप्त भावना व्यक्त करते. अगदी असाच एक प्रसंग संत चोखोबांच्या आयुष्यात घडलेला दिसतो.

घाव घाली विठो आता। चालू नको मंद
आज मारिती बडवे। काहीतरी अपराध
विठोबाचा हार। तुझ्या कंठी कसा आला
शिव्या देवुनी मारा म्हणती। देव का बाटविला

जनाबाईवर पदक चोरल्याचा तर चोखोबांवर कंठा (गळाहार) चोरल्याचा आरोप केला जातो. चोखोबांवर तसाच हल्ला होतो. बडव्यांकडून मारहाण होते. दोघांवरील अन्यायाची जातकुळी एकच आहे. त्यांचे अस्पृश्यतेचे दुःख समानधर्मा आहे. डॉ. सा. द. सोनसळे म्हणतात, "या दोन संदर्भात काही भेद असतीलही परंतु अन्याय करणा-यांची जातकुळी एकच आहे. अत्याचार सोसणा-यांची जातकुळी एकच आहे." (मूल्यवेधी सम्यक समीक्षा, डॉ. सा. द. सोनसळे, पृ. ४३) चोखोबा अस्पृश्य यातीहीन असल्याची ओळख त्यांच्या अभंगांतून स्पष्ट झालेली आहे. परंतु जनाबाईच्या याती संदर्भात संभ्रम आहे. ती आपल्या दुःख वेदनांचे आविष्करण करताना कुठेही यातीचा उल्लेख करत नाही परंतु ती अस्पृश्य असावी असे अनेक अभ्यासक संशोधकांचे मत आहे. तारा भवाळकर, केशव वा. वसेकर, राजा ढाले, सुहासिनी इर्लेकर आदी ज्येष्ठ समीक्षकांसह डॉ. सा. द. सोनसळे, स्वतः लेखक कीर्तीकुमार मोरे आदींनी हे मत आग्रहाने मांडलेले दिसते.

राजाई गोणाई अखंडित तुझे पायी
मज ठेवियले दारी निच म्हणोनि बाहेरी
नारा गोंदा विठा म्हादा ठेवियले अग्रवाटा
देवा कवा भेट देसी आपुली म्हणौनि जनी दासी

नामयाच्या कुटुंबियांना मिळणा-या मानसन्मानास जनाबाई पात्र नाही याचे शल्य व्यक्त करणारा हा अभंग तिच्या यातीहिनतेची द्वाही देतो. सुप्रसिद्ध विचारवंत राजा ढाले यांनी 'वाळवंटाची लेकः जनाबाई' नावाचा लेख लिहून संसंदर्भ ती अस्पृश्यांपैकी 'गोपाळ' समाजातील असावी असे म्हटले आहे. जिज्ञासूंनी हा लेख मूळातून वाचावा असा आहे. गंगाखेड परिसरात मात्र ती अस्पृश्यांपैकी महार समाजातील असावी असे बोलले जाते.

चोखोबांसंदर्भातील एका अभंगातही जातजाणीव खूप प्रकर्षाने जनाबाई व्यक्त करते.

यातीहिन चोखामेळा। त्यासी भक्तांचा कळवळा
त्याचा जाला म्हणी यारा। राहे धरी धरी थारा
देव बाटविला त्याने। हासे जनी गाय गाणे

या अभंगात ‘देव ऋणी करणा-या’ चोखोबांसारख्या भक्तावर यातीहिनतेमुळे अन्याय करणा-या दांभिकांचा उपहास जनाबाई करते. कारण त्याची थोरवी तिने जाणलेली आहे. ‘हासे जनी गाय गाणे’ हे उद्‌गार खूप सूचक आहेत. ‘चोखामेळ्याची करणी। तेणे देव केला ऋणी।’ असे ती म्हणते किंवा ‘जो का भक्त यातीहिन। देव करी त्याचा मान।’ असे ती म्हणते तेव्हा उदार विठ्ठलाचे रुप ती रेखाटत असते. जनाबाईंच्या अभंगातून जात्यातीत विठ्ठल वारकरी आणि अन्य विठ्ठलभक्तांनी समजून घेतला पाहिजे.

संत जनाबाईंच्या कवितेत लिंगभावही कमालीच्या तीव्रतेने व्यक्त झाला आहे. ‘स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास’ असा दिलासा समग्र स्त्री जगताला देणारी कवयित्री जनाबाई आपल्या मानव्याचा उद्‌गार करते, एल्गार करते. तत्कालीन समाजजीवनावर आणि धार्मिक जीवन पुरुष प्रधानच होते. स्त्री ही अबला, पराधीन, परपोषी अन् परतंत्र होती. धार्मिक क्षेत्रातही जनाबाईंचे स्वतंत्रपणे वावरणे, काव्य आणि भक्तीच्या क्षेत्रातील तिचे लिलया वावरणे पुरुषप्रधान व्यवस्थेला असह्य झाले असणार. पण जनाबाई बेपर्वा होत आपल्या स्वातंत्र्याचा उच्चार करते.

डोईचा पदर आला खांद्यावरी
भरल्या बाजारी जाईन मी
हाती घेईन टाळ खांद्यावरी विणा
आता मज मना कोण करी
पंढरीच्या पेठे मांडियले पाल
मनगटावर तेल घाला तुम्ही
जनी म्हणे देवा जाले मी वेसवा
रिघाले केशवा घर तुझे

स्वातंत्र्याचा उच्चार गुलामीचा कडेलोट करुनच करता येतो. जनाबाई सारे पाश तोडू शकत नसली तरी तिचा निःसंगपणा तिचा असंतोष तिच्यातील विद्रोहाचे प्रतीक आहे.

संत कान्होपात्रा ही वेश्या स्त्री. भक्तीमार्गाचा स्वीकार करुन आपल्या परंपरागत व्यवसायातून बाहेर पडू पाहते. तर जनाबाई ‘जाले मी वेसवा’ म्हणत स्वतंत्र श्वास घेऊ पाहते. आपल्या उद्‌गारांनी समाज बदलेलच असे नाही पण

म्हणून व्यक्त व्हावयाचे नाही हे न्याय्य नव्हे. कालौघातत्याचे अर्थनिर्णयन होत राहील. जनाबाई ह्याच धिटाईने सामाजिक संकेतांपलीकडे जाऊन व्यक्त होताना दिसते. कान्होपात्रा आणि जनाबाई यांच्या मुक्तीचे अर्थनिर्णयन करताना विलास खोले म्हणतात, "कान्होपात्रा आणि जनाबाई यांच्या उच्चारणातील व वर्तनातील विरोध मनोज्ञ आहे. कान्होपात्रा आपल्या घरातला गणिकेचा व्यवसाय आणि गणिकेचे आयुष्य नाकारते आणि विठ्ठलाला वाहून घेते तर आपले दासीपद जपणारी जनाबाई विठ्ठलाबद्दलची आपली भक्तीभावना डोईचा पदर आला खांद्यावरी.... या अभंगातून सामाजिक संकेतापलीकडे जावून व्यक्त करते." (संत जनाबाई आणि अन्य मध्ययुगीन संत कवयित्री यांची कविता- संपा. विलास खोले, पृ. ९) याचा अर्थ काय तर कान्होपात्रेच्या स्वातंत्र्यात ती आनंदी नाही आणि जनाबाईंना स्त्री म्हणून होणारी उपेक्षा मान्य नाही. दोघींच्या मुक्तीचा आधार भक्तीच आहे. पण पुरुषप्रधान दांभिकतेवर प्रहार करण्यासाठी जनाबाई व्यक्त होते. 'देव देते देव घेते, देवावरी मी निजते' अशा शब्दांत ती व्यक्त होते त्याचे कारण स्त्रीकडे पाहण्याच्या पुरुषसत्ताक मानसिकतेवर प्रहार करणे हेच असते. नैसर्गिक भेदापलीकडे स्त्री ही सुद्धा माणूस आहे हेच सूचित करणारा मनोभाव जनाबाईंच्या कवितेला स्वतंत्र अवकाश मिळवून देतो. तिच्या वेदनेपल्याड जाणारा तिचा क्रांतदायी विचार चिंतनाचा विषय होत नाही हेच वाईट आहे.

संत सोयराबाई व निर्मळा यांच्या अभंगातूनही जातजाणिवांचा आविष्कार झालेला पाहावयास मिळतो. चोखोबांचा अध्यात्मिक अधिकार मोठा होता. जनाबाईने त्याची थोरवी कथन केली आहे. 'सकळ समुदाय चोखियाचे घरी। रिद्धी सिद्धी द्वारी तिष्ठताती' अशा शब्दांत सोयरा त्याचे महात्म्य वर्णन करते. चोखोबांच्या घरी संताचा राबता असे. जेवणावळी उठत. परंतु बाहेर समाजात संत मंडळी बचावात्मक वर्तन करीत असत. चोखोबांचा पुत्र कर्ममेळा याच कारणास्तव 'आमुचे घरी भातदही खाऊनी कैसा म्हणसी नाही' असा संतप्त सवाल करतो. सोयराही 'अवघे सुखाचे सांगाती। दुःख होता पळती आपोआप' अशा शब्दांत संतांचा वर्तनविरोध मांडते। याचा अर्थ असा की पंढरीच्या ब्राह्मणांकडून यातीहिन चोखोबांचा छळ होत होता. योसरा त्या कळाछळाची कहाणी 'पंढरीचे ब्राह्मणे चोख्यासी छळीले' अशा शब्दांत चित्रित करताना दिसते. जातीय छळातून बाहेर पडण्यासाठी ती विठ्ठलावर विश्वासते.

आमची तो दशा विपरित झाली। कोण आम्हा घाली पोटामध्ये
आमचे पालन करील बा कोण। तुजविण जाण दुजे आता
किंवा
आमुचा विचार काय आता देवा। सांभाळी केशवा मायबापा

किंवा

माझे मन तुमचे चरणी। तुची माझा देवा धनी

इत्यादी अभंगाच्या ओळीतून ती विठ्ठलाकडे आधार म्हणून पाहते. यातीहिन असल्यामुळे आमच्या दुःखाकडे दुर्लक्ष करतोस काय? असा प्रश्नही विठ्ठलाला विचारते. शेवटी 'जे तुम्हा कळें ते करा। गोमट बरे का बोखटे गोड दिसे' असे म्हणत ती सारे त्याच्यावर सोडते. सोयराबाई किती शैलीदार पद्धतीने त्याच्या जबाबदारीची जाणीव त्यालाकरुन देताना दिसते.

प्रस्थापित सवर्णांना अस्पृश्यांचा विटाळ होत असे. त्यामुळे अस्पृश्याचा स्पर्शही त्याज्य मानला जाई. अस्पृश्यतेची ही वेदना असह्य झाल्यामुळे सोयराबाई ह्या व्यवस्थेचा सडकून समाचार घेते.

देहासी विटाळ म्हणती सकळ। आत्मा तो निर्मळ बुद्ध बुद्ध
देहीचा विटाळ देहीच जन्मला। सोवळा तो झाला कवण धर्म
विटाळाचौनि उत्पत्तीचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी

विटाळाशिवाय जगाची निर्मितीच नसल्याचा निर्वाळा सोयरा देते.

संते चोखोबांची बहीण निर्मळा विटाळाची नवी परिभाषा मांडते. देहाचा देहाशी होणारा स्पर्श विटाळाचे कारण नव्हे. पण परद्रव्य, परान्न आणि परनारीला मात्र स्पर्श करु नये. असा नैतिक विचार निर्मळेच्या अभंगांतून व्यक्त होताना दिसतो.

परद्रव्य परान्न परनारीचा विटाळ। मानावा अढळ परमार्थी
निर्मळा म्हणे हाचि परमार्थ। संताचा सांगात दिननिशी

केवळ जातजाणीवच नव्हे तर निर्मळा परमार्थाची नवी परिभाषाही मांडते. संख्येने अस्प पण विचारप्रवर्तक अभंग रचना निर्मळेच्या नावावर आहे.

मुक्ताबाई संत ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण. संतमेळ्यातही वयाने सर्वात लहान. उणेपुरे वीसेक वर्षांचे आयुष्य तिला लाभले असावे. निवृत्तीनाथ (मुक्ताबाईंचे ज्येष्ठ बंधु) हे मुक्ताबाईंचे गुरु. वयाने लहान असूनही वारकरी संप्रदायात ज्ञानदेव, नामदेवांइतके महत्त्वाचे स्थान तिने प्राप्त केले. स्वतः नामदेव 'लहानशी मुक्ताबाई जशी सणकाडी। केलो देशोधडी महान संत' असा तिचा उल्लेख करतात. यात तिच्या अध्यात्मिक अधिकाराचे मोठेपण आणि गौरवही व्यक्त झाला आहे. याच नामदेवांबद्दल मुक्ताबाई मात्र अखंड 'जयाला देवाचा शेजार। का रे अहंकार नाही गेला' अशा शब्दात फटकारते. चांगदेवासारख्या वयोवृद्ध योग्याचे मातृत्व स्वतःकडे घेत त्याच्यासाठी अंगाई गाते. आणि स्वतःला झोपडीत कोंडून घेतलेल्या ज्ञानेश्वरांना 'तुम्ही तरोन जग तारा' असा उपदेश करते. हे सर्व संदर्भ मुक्ताबाईंच्या अध्यात्मिक अधिकार स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत.

"मुक्ताबाईंच्या नावावर सकलसंतगाथा खंड १ मधील ४२, ज्ञानेश्वरांची प्रभावळमधील ८ व ताटीचे ५ असे एकंदर पंचावन्न अभंग सांगितले जातात. मुक्ताबाईसंबंधी संशोधन केलेल्या संशोधन केलेल्या अभ्यासकांनी स्वीकारलेली रचना मान्यकेलीतर ही संख्या सव्वाशेच्या घरात जाण्याची शक्यता आहे." (संत जनाबाई आणि अन्य मध्ययुगीन संत कवयित्री - संपा. विलास खोले, पृ. १४१) असे विलास खोले नोंदवतात. या उपलब्ध संपदेत 'मुंगी उडाली आकाशी, तिने गिळीले सूर्याशी'सारखा आत्मसामर्थ्याची जाणीव व्यक्त करणारा अभंग येतो. देवाचे सर्व ठायी असणे, नाममहात्म्य, षड्रिपूंचा नाश, सगुण-निर्गुण रुप वर्णन, इत्यादी तत्त्वज्ञानपर अभंगांचा समावेशही आहे. मात्र मुक्ताबाई, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानादी भावडांना झालेल्या त्रासाबद्दल एकही शब्द का उच्चारित नाही असा प्रश्न पडतो. ही सर्व भावंडे जन्माने ब्राह्मण. विठ्ठलपंतांनी सन्यासाश्रम स्वीकारुन गुरुआदेशावरुन गृहस्थाश्रमात पदार्पण केल्यानंतर झालेली ही सर्व अपत्ये. विठ्ठलपंतांच्या धर्मद्रोहावरुन कर्मठ ब्राह्मणांनी केलेल्या कळाछळांना कंटाळून त्यांनी आपली पत्नी रुक्मिणीसह देहत्याग केला. आई-वडिलाविण पोरक्या भावंडांनाही सळो की पळो करुन सोडले. या कळाछळांचा ठाव मुक्ताई का घेत नाही. ज्ञानदेव ब्रह्मवृंदांच्या ह्याच त्रासाला कंटाळून रागाने स्वतःला कोंडून घेतात. 'तुम्ही तरोन जग तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा' अशी देणारी मुक्ताई तत्कालीन जातव्यवस्थेवर एकही अभंग लिहित नाही हे विशेष.

आत्मलोप किंवा परत्वाशी विलीन होण्याचा अनुभव एका अभंगातून व्यक्त होते. 'परपुरुषा रतले जीवेभावे' ही परमेश्वराशी एकरुप होण्याची जाणीव लिंगभावाचे उदाहरण म्हणूनही पाहता येऊ शकेल. किंवा 'आम्हा नाम नाही आम्हा रुप नाही। नामरुप नाही तेचि आम्ही' या अभंगातून जाणीवनेणिवेपलीकडे जाणे हा अर्थ सूचित होतो. नामरुप म्हणजे जाणीव. आत्मलोपाची ही जाणीव बुद्ध तत्त्वज्ञानातील निब्बाणाशी संवादी आहे. मुक्ताबाईंची गुरुपरंपरा निवृत्तीनाथांकडे नाथसंप्रदायाशी जोडली जाते. नाथसंप्रदायावर बुद्धांचा प्रभाव होता. तो मुक्ताबाईंवर असणेही स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

तुकारामशिष्या संत कवयित्री बहिणाबाई शिऊरकर यांच्या अभंगांतून जातजाणीव आणि लिंगभावही अत्यंतिक टोकदारपणे व्यक्त झाला आहे. बहिणाबाई यजुर्वेदी ब्राह्मण. तीसवर्षीय रत्नाकर पाठक नावाच्या बिजवराशी विवाह होतो. हा शिऊर येथील ब्राह्मण कमालीचा सनातनी होता. बहिणाबाईंना तुकारामांनी स्वप्नात दृष्टांत दिला आणि तेव्हापासून तिने तुकारामांना गुरु मानले. यातीशुद्राचे गुरुत्व स्वीकारुन पत्नीने पत्करलेला भक्तीमार्ग रत्नाकर पाठकांना अमान्य होता. या कारणास्तव त्याने तुकारामांना दुषणे दिली. त्यात त्याचा जाती

अंहकार अन् शुद्राप्रती कमालीचा दुजाभाव आकस, घृणा, तिरस्कार व्यक्त झाला आहे.

नाही गुरुसेवा घडली जोवरी। हस्तक हा शिरी सद्‌गुरुचा
तोवरी तो गुरु कासयाचा खरा। शुद्राचिया अंतरा ज्ञान कैचे
स्वप्नीचा अनुगृह गुरु केला शुद्र। तोही दळीभद्र ज्ञानहिन

वेदादी शास्त्रे आणि पुराणांनी पोसलेला लिंगभेद, लिंगभाव बहिणाबाईच्या टीकेचे लक्ष होतो.

वेद हाका देती पुराणे गर्जनी। स्त्रीयेच्या संगती हित नोहे
मी तो सहज स्त्रियेचाची देह। परमार्थाची सोय आता कैची
मुर्खत्व ममता मोहन मायीक। संगची घातक स्त्रियेचा तो
बहिणी म्हणे स्त्रीदेह घातकी। परमार्थ या लोकी केवी साधे

वेद पुराणांनी स्त्रीयांप्रती दुजाभाव बाळगला. स्त्री म्हणजे ‘नरकाचे द्वार’, ‘पापयोनी’, ‘मोक्षमार्गातील धोंड’ होय. म्हणून परमार्थ साधणेही शक्य होत नाही. आपण स्वतः स्त्रीदेही आहोत म्हणून परमार्थाची सोय राहिली नसल्याचे शल्य इथे व्यक्त झाले आहे. परंपरावाद्यांनी स्त्रीदेह घातकी ठरवल्याचे सांगतानाच बहिणाबाई स्त्रीजन्माची पराधीनता व्यक्त करतात. ‘स्त्रियेचे शरीर पराधीन देह। न चाले उपाव विरक्तीचा’ हे तिचे उद्‌गार पुरेसे बोलके आहेत.

पतीकडून होणारा अन्याय बहिणाबाईंनी चव्हाट्यावर आणला. तुकोबांचे गुरुत्व पत्करुन विठ्ठलमार्गी लागलेल्या पत्नीचे वाढते महत्त्व पाहून तिच्यावरील अन्यायाला पारावार राहात नाही. पतीचा पुरुषी अहंकार जागा होतो. आपल्यावरील शारीर अन्यायाला वाचा फोडण्याचे काम बहिणाबाई करते. प्रतिकूल परिस्थितीत तिने केलेले हे धाडस कौतुकास्पद मानावे लागेल.

नवल जनासी वाटले म्हणोनि। येती धावोनी पहावया
भ्रतार हो माझा देखोनि तयारी। माझीया देहासी पीडा करी
न देखवे तया द्वेषी जनाप्रती। क्षणाक्षणा चित्ती द्वेष वाढे
म्हणे ही बाईल मरे तरी बरी। इस का पामरे भेटताती
किंवा
भ्रतार म्हणतसे आम्ही की ब्राह्मण। वेदाचे पठण करु सदा
कैंचा शुद्र तुका स्वप्नीचे दर्शनी। बिघडली पत्नी काय करु

या उद्‌गारांतून बहिणाबाईंच्या पतीचा तुकारामद्वेष आणि पुरुषसत्ताक मानसिकता दोहोंवर प्रकाश पडतो. ‘भ्रतार तो मज ओढतो एकांती। भोगावे मजसी म्हणोनिया’ असे ती म्हणते तेव्हा पुरुषांची स्त्रीकडे ‘उपभोग्य वस्तू’ म्हणून पाहण्याची वृत्तीच अधोरेखित होते. बौद्धाचार्य अश्वघोषाच्या वज्रसूचीचा

मराठी अनुवाद करुन आपली विद्वत्ता आणि विचार परंपरा सिद्ध करणारी संत बहिणाबाई स्वतंत्र संशोधनाचा विषय व्हायला हवी.

सारांश असा की, वारकरी संप्रदायाच्या निमित्ताने अध्यात्मिक धर्मभावना व्यक्त करण्याची संधी अठरापगड जात समूमहांबरोबर स्त्रीयांनाही मिळाली. धर्मभावना व्यक्त करतानाच स्त्रीयांनी आत्मपर भावनाही व्यक्त केल्या आणि स्वातंत्र्याचा उचित फायदा घेतला. जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, कान्होपात्रा आदी उपेक्षित संत कवयित्रींच्या कवितेतून प्राधान्याने जातलिंगभावाचा आविष्कार झाला. मुक्ताबाई या संतकवयित्रीने मात्र आपल्या भावंडांवरील अन्यायाविरुद्ध बोलण्याचे टाळलेले दिसते. उलट ब्राह्मण असूनही आपल्यावर स्त्री म्हणून होणारा अत्याचार आक्रमकपणे मांडण्याचे कार्य संत बहिणाबाईंकडून घडते. या स्वरुपाचा अभ्यास आधुनिक स्त्रीवादी साहित्य प्रवाहाला ऊर्जा प्राप्त करुन देऊ शकतो हे निःसंशय.

❑❑❑